## सी.सी.ए. क्रं.६४/२०१५ मधील निशाणी—१२५ खालील आदेश
## CNR No.MHCO20-000081-2015

वादी नामे बाळासाहेब पिता कोंडीबा वाघ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जासोबत वादी यांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रं.१२६ लगत दाखल केलेले आहे.

२. वादी यांनी त्यांच्या दावा दुरुस्तीच्या अर्जात असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हूकुम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या दाव्यात शिवदत्त सहकारी गृह निर्माण संस्था, औरंगाबाद ही सहकारी संस्था प्रतिवादी क्रं.१ म्हणुन समाविष्ट आहे. प्रस्तुतचा दावा हा सन २०१५ मध्ये दाखल केलेला असुन तो न्यायालयात प्रलंबित असताना सक्षम अधिकारी यानी प्रतिवादी क्रं.१ संस्थेवर प्राधिकृत अधिकरी यांची नेमणुक केल्यामुळे वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन सदर प्राधिकृत अधिकारी यांना दाव्यात प्रतिवादी क्रं.१ संस्थेचे प्रतिनिधी म्हणुन समाविष्ट केलेले आहे. परंतु सध्या सदर प्राधिकृत अधिकारी यांनी प्रतिवादी क्रं.१ संस्थेचा कार्यभार नव्याने निवडुन आलेल्या कार्यकारी मंडळाकडे सुपुर्द केलेला आहे. प्रतिवादी क्रं.१ संस्थेचे प्रतिनिधित्व सध्या सदर संस्थेचे अध्यक्ष करीत आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यातून प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेचे प्रतिनिधी म्हणून दाव्यात समाविष्ट असलेले प्राधिकृत अधिकारी यांचे नाव कमी करुन सदर संस्थेचे अध्यक्ष यांना पुन्हा दाव्यात प्रतिवादी क्रं.१ संस्थेचे प्रतिनिधी म्हणुन समाविष्ट करण्यासाठी वादी यांना प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरूस्ती दाव्यात केल्यास दाव्याच्या मूळ स्वरूपामध्ये कुठलाही बदल होणार नाही. अशा कथनांसह वादी यांनी त्यांचा दावा दुरूस्तीचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्रं.१ चे वतीने त्यांचे विधिज्ञ श्री. के.एम. बरदापूरकर यांनी त्यांचे लेखी म्हणणे प्रस्तुतच्या अर्जावरच सादर केलेले असुन त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, वादी यांनी अतिशय विलंबाने प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज सादर केलेला असुन त्यामध्ये झालेल्या विलंबाचे कुठलेही रास्त व सयुंक्तीक कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे असे दिसुन येते की वादी यांना प्रस्तुतच्या दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकायचे असुन त्यांना दावा चालविण्यामध्ये कुठलेही स्वारस्य राहीलेले नसल्याने प्रस्तुतचा दावा

दुरुस्तीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी क्रं.१ चे विधिज्ञांनी केलेले आहे.

**४.** वादी व प्रतिवादी क्रं.१ यांनी त्यांचे अनुक्रमे अर्ज व लेखी जबाबामध्ये केलेल्या कथनांवरुन प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर निकाली करण्याकरीता खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यांचा निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्जातील नमूद दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यानचा मुळ वाद कायमस्वरुपी गुणदोषावर निकाली करण्याकरीता आवश्यक आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होईल काय ? | नकारार्थी. |
| ३. | प्रस्तुतचा अर्ज मुदतीत आहे काय ? | होकारार्थी. |
| ४. | आदेश ? | अंतिम आदेशानुसार. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**५.** मी वादी यांच्या वतीने त्यांचे विधिज्ञ श्री. जी.व्ही. सुकाळे व प्रतिवादी क्रं.१ यांच्या वतीने त्यांचे विधिज्ञ श्री. के.एम. बरदापुरकर यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच उभय पक्षांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u> :—**

**६.** वादी यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींचे विरुदध जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हूकुम मिळण्यासाठी दाखल केलेला असुन प्रस्तुतच्या दाव्यामध्ये शिवदत्त सहकारी गृह निर्माण संस्था, औरंगाबाद या सहकारी संस्थेस प्रतिवादी क्रं.१ म्हणुन समाविष्ट केलेले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा सन २०१५ मध्ये दाखल केलेला असुन त्यानंतर सक्षम अधिकारी यांनी प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती केली होती. त्यामुळे वादी यांनी त्यांच्या दाव्यात दुरुस्ती करुन प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेचे प्रतिनिधी म्हणुन सदर प्राधिकृत अधिकारी यांना दाव्यात समाविष्ट केले होते. परंतु सध्या सदर प्रातिधकृत अधिकारी यांनी प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेचा कार्यभार नव्याने निवडुण आलेल्या

कार्यकारी मंडळाकडे सुपुर्द केलेला असल्याने प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेचे दाव्यातील प्रतिनिधी म्हणुन समाविष्ट असलेले प्राधिकृत अधिकारी यांचे नाव दाव्यातुन कमी करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रतिवादी क्रं.१ यांनी त्यांचे लेखी म्हणण्यामध्ये केवळ असे नमुद केले आहे की वादी यांनी अतिशय विलंबाने प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केलेला असुन झालेल्या विलंबाचे कुठलेही सयुंक्तीक कारण त्यांनी अर्जात नमुद केलेले नाही. परंतु, प्रतिवादी क्रं.१ यांनीच पुरसिस दाखल करुन प्राधिकृत अधिकरी यांनी नेमणुक रद्द झालेली असुन सध्या नव्याने निवडुण आलेले कार्यकारी मंडळ अस्तित्वात आलेली असल्याचे कळविलेले आहे.

७. वादी व प्रतिवादी क्रं.१ यांच्या कथनांचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेवर पूर्वी सक्षम अधिकारी यांनी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती केली होती. त्यामुळे वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन सदर प्राधिकृत अधिकारी यांना दाव्यात समाविष्ट केले होते. परंतु सद्य परिस्थिमध्ये प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेचा कार्यभार सदर प्राधिकृत अधिकारी यांनी नव्याने निवडुण आलेल्या कार्यकारी मंडळाकडे सोपविलेला असल्याने वादी यांना प्रस्तुतच्या दाव्यातून सदर प्राधिकृत अधिकारी यांना कमी करणे क्रमप्राप्त झालेले आहे. वास्तविक पाहता प्रस्तुतच्या अर्जात वादी यांनी नमूद केलेली दुरूस्ती ही अतिशय तांत्रिक स्वरूपाची असुन केवळ प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेच्या सद्य परिस्थितील प्रतिनिधीचा प्रस्तुतच्या दाव्यात समावेश करण्यासाठी आवश्यक झालेली आहे. तसेच सदरची दुरूस्ती जर मूळ दाव्यामध्ये केल्यास त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेचा सद्य परिस्थितील प्रतिनिधी प्रस्तुतच्या दाव्यात सदर सहकारी संस्थेची बाजू न्यायालयासमोर मांडु शकणार आहे. प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेवर पुर्वी नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांचा कार्यभार निवडुण आलेल्या कार्यकारी मंडळाकडे सुपुर्द केलेला असल्याने सदर प्राधिकृत अधिकारी यांना प्रस्तुतच्या दाव्यात प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेचा प्रतिनिधी म्हणुन कायम ठेवणे न्यायोचित ठरणार नाही. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरूस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यानचा मूळ वाद कायमस्वरूपी गुणदोषावर निकाली करणेकामी महत्वपूर्ण आहे. जर प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केला तर निश्चितच वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचा मूळ वाद निर्णयीत निघणार नाही व भविष्यात न्यायालयीन प्रकरणांची गुंतागुंत निर्माण होईल. त्यामुळे वरील सर्व चर्चेच्या अनुषंगाने मी या

निर्णयाप्रत आलो आहे की, वादी यांनी त्यांच्या दावा दुरुस्तीच्या अर्जात नमूद केलेली दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचा मूळ वाद कायमस्वरुपी गुणदोषावर निकाली करणेसाठी आवश्यक आहे. यावरुन मी मुद्दा क्रं. १ चा निष्कर्ष “होकारार्थी” नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u> :—**

**८.** वादी यांचा मुळ दावा हा प्रतिवादींविरूध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरुस्तीमुळे प्रतिवादी क्रं.१ या सहकारी संस्थेच्या पूर्वीच्या प्रतिनिधीऐवजी सद्य परिस्थिमध्ये सदर सहकारी संस्थेचा असलेला प्रतिनिधी दाव्यामध्ये समाविष्ट होणार असुन त्यांचे मार्फत प्रतिवादी क्रं. १ या सहकारी संस्थेची बाजू प्रस्तुतच्या दाव्यात न्यायालयासमोर मांडली जाणार आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करून दाव्यात दुरूस्ती केल्यानंतर देखीलही वादी यांचा दावा हा प्रतिवादींविरूध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठीच राहणार असून दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कुठलाही बदल होणार नाही. यावरुन मी मुद्दा क्रं.२ चा निष्कर्ष “नकारार्थी” नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रं. ३ बाबत</u> :—**

**९.** प्रस्तुतचा मुद्दा हा वादी यांना दावा दुरुस्तीचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये विहीत मुदतीत दाखल केलेला आहे किंवा नाही याबाबत उपस्थीत झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा मा. महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे अपील क्र.१३४/२०१८ मधील आदेशान्वये फेर चौकशीकामी सहकार न्यायालयाकडे पाठविण्यात आलेला असुन सदर दाव्यात अतिरीक्त मुद्दे काढण्यास देखील आदेशीत केलेले असुन अद्यापावेतो सदर अतिरीक्त मुद्दे निश्चित करणे बाकी असल्याने दाव्याच्या चौकशीचे कामकाज सुरु झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज वादी यांनी कायदयाने विहीत केलेल्या मुदतीत दाखल केलेला असल्याचे दिसुन येते. यावरुन मी मुद्दा क्रं.३ चा निष्कर्ष “होकारार्थी” नोंदवित आहे.

**१०.** वरील सर्व चर्चेच्या अनुषंगाने व मुद्दा क्रं. १ ते ३ च्या निष्कर्षावरुन मी या निर्णयाप्रत आलो आहे की, वादी यांनी दाखल केलेला दावा दुरूस्तीचा अर्ज मंजूर

होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी न्यायाच्या दृष्टीकोनातून खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** अर्ज मंजूर करण्यात आला.

**२.** वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जातील नमूद दुरुस्ती या आदेशापासून १४ दिवसांचे आत दाव्यात करावी व दाव्याची दुरुस्त प्रत दाव्यासोबत कायदेशीर मुदतीत दाखल करावी.

आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by TUSHAR BALASAHEB WAJE
Date: 2022.05.12 15:19:24 +0530

**(तुषार बा.वाजे)**
न्यायाधीश, सहकार न्यायालय,
औरंगाबाद.

स्थळ: औरंगाबाद
दि. ०५.०५.२०२२.